# महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड

(एम.पी.सी.एल.)

(महाराष्ट्र शासन अंगिकृत उपक्रम)

# नागरिकांची सनद

# महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड

# (एम.पी.सी.एल.)

## <u>नागरिकांची सनद</u>

१) महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड हे महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांच्या प्रशासनिक नियंत्रणाखाली येत असून त्याची नोंदणी कंपनीज अ‍ॅक्ट, १९५६ अन्वये करण्यात आलेली आहे. हे महामंडळ १००% महाराष्ट्र शासनाच्या मालकीचे आहे.

एमपीसीएल एप्रिल-१९८१ साली पुढील उद्देशांकरिता स्थापित झाले :

१) बॉम्बे हाय वरुन प्राप्त होणाऱ्या गॅसवर आधारित महाराष्ट्र गॅस क्रॅकर कॉम्लेक्स निर्माण करणे व

२) पेट्रोकेमिकल्सवर आधारित उत्पादने तयार करण्याकरिता युनिट्सना चालना देणे.

याकरिता महाराष्ट्र शासनाने रु.८.९५ कोटींची तरतूद केली.

२) परंतु केंद्र शासनाने गॅस क्रॅकर कॉम्लेक्स आय.पी.सी.एल. ला सोपविला, त्यामुळे उपरोक्त (२) या उद्देशापुरतेच एमपीसीएलचे कार्यक्षेत्र सिमित राहिले. त्यामुळे सन १९९१ ते सन १९९३ या दरम्यान शासनाने टप्प्या-टप्प्याने पुरविलेल्या रु.८.९२ कोटी या रकमेतून एमपीसीएलने संयुक्त प्रकल्पांत गुंतवणूक केली व तदनंतर यशस्वीरित्या निर्गुंतवणूक करुन रु.१५.२६ कोटी प्राप्त रक्कम सध्या वित्तीय संस्थेमध्ये मुदतठेवीत गुंतविलेली आहे.

३)	राज्यात (१) नैसर्गिक वायु बाबतचे धोरण ठरविणे,(२) नैसर्गिक वायु क्षेत्राचा विकास करणे तसेच (३) नैसर्गिक वायु वितरणाचे जाळे निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र शासन उद्योग. ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक २७/०६/२००६ अन्वये महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लि. (एमपीसीएल) ला गॅस क्षेत्राबाबत नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

४)	**<u>एमपीसीएलच्या संचालक मंडळाची दिनांक १ जानेवारी, २०१३ रोजीची रचना :</u>**

या महामंडळावर पुढीलप्रमाणे अध्यक्ष व शासकीय सदस्य आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष | .. .. | श्री.चंदू राणे |
| २. | संचालक | .. .. | श्री. संजय सेठी, भाप्रसे<br>विकास आयुक्त (उद्योग). |
| ३. | संचालक | .. .. | श्री. बलदेव सिंग, भाप्रसे<br>व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम. |
| ४. | संचालक | .. .. | श्री. संजय सावंत, भाप्रसे<br>व्यवस्थापकीय संचालक, एमपीसीएल. |

उपरोक्त सर्व हे महाराष्ट्र शासन स्तरावरुन नियुक्त केले जातात.

५)	एमपीसीएलच्या कार्यालयाच्या आस्थापनेवर दोन सेक्रेटरीयल कर्मचारी, दोन चतुर्थश्रेणी कर्मचारी व एक वाहनचालक आहे.

६)	या महामंडळाच्या अधिपत्याखाली कुठलेही क्षेत्रिय अथवा अन्य कार्यालये नाहीत.

Maharashtra Petrochemicals Corpn. Ltd.

**महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ८(१) नुसार महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड यांची जनतेशी संबंधित कामांबाबतची**

## नागरिकांची सनद

नागरिकांची सनद याचा अर्थ कार्यालय/महामडंळ किंवा विभागाने दिलेल्या सेवा किंवा सुविधा तसेच त्या सेवा किंवा सुविधा सर्वसामान्य जनतेला पुरविण्यासाठी असलेली कालमर्यादा असा आहे.

परंतु हे महामंडळ कुठलीही योजना अथवा कार्यक्रम राबवित नसून सद्या ते सुप्तावस्थेत आहे. या महामंडळाचा जनतेशी संबंध येत नाही. तथापि, याद्वारे असे प्रसिध्द करीत आहोत की, कामासंबंधी काही माहिती या महामंडळाकडून हवी असल्यास व तसा अर्ज प्राप्त झाल्यास, त्याची दखल घेऊन प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येईल.

या महामंडळाने माहितीच्या अधिकाराखाली पुढीलप्रमाणे अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली आहे :

| | | नांव | | पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. सहाय्यक माहिती अधिकारी | .. | श्रीमती स्मृती कांबळे | .. | स्वीय सहायक (वित्त व लेखा) |
| २. माहिती अधिकारी | .. | श्रीमती ममता सुवर्णा | .. | स्वीय सहायक (उच्चश्रेणी) |
| ३. अपिलीय अधिकारी | .. | श्री.संजय सावंत,भाप्रसे | .. | व्यवस्थापकीय संचालक |

उपरोक्त अधिनियमांतर्गत शासनाने शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध करण्याकरिता आवश्यक तरतुदींसह कायदा अस्तित्वात आणला आहे.

१. विशिष्ट प्रकरणी अंतिम निर्णय विहित कालावधीत घेण्यात आला नाही, तर कार्यवाही न केल्याबद्दल संबंधित कर्मचाऱ्यास जबाबदार धरले जाऊन या अधिनियमांतर्गत उल्लेखिलेली कारवाई त्यांच्यावर करण्यात येईल.

Maharashira Petrochemicals Corpn. Ltd.

२. सदर अधिनियमान्वये प्रकरणे शिघ्रतेने व प्राधान्याने विहित केलेल्या मुदतीत निकालात काढली जातील व याचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल.

३. शासकीय किंवा महामंडळाशी निगडीत कामकाज पार पाडण्यास जाणून-बुजून किंवा हेतूपुरस्सर विलंब करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या विरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ खालील नियमान्वये शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल व आवश्यक असल्यास अशा कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालात कर्तव्य पालनात कसुरीबाबत नोंद घेण्यात येईल.

४. कार्यालयाबाहेर दर्शनीय भागामध्ये माहिती अधिकारी व अपिलय अधिकारी यांच्या नांवाचे फलक लावण्यात आले आहेत.

५. महामंडळाकडून माहिती घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी बसण्याकरिता आसन व्यवस्था, पिण्याचे पाणी इत्यादि सोय करण्यात आली आहे.

महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड या महामंडळाचा पत्ता खालीलप्रमाणे आहे :

२१४, मरीन चेंबर्स,
४३, न्यू मरीन लाईन्स,
एस.एन.डी.टी. कॉलेजच्या समोर,
चर्चगेट, मुंबई-४०० ०२०.
<u>दूरध्वनी क्रमांक</u> : (०२२) २२०१ ६८८१
(०२२) २२०१ ६८८३
<u>फॅक्स क्रमांक</u> : (०२२) २२०१ ६८८२
ई-मेल : mpclmd1@gmail.com
mdmpcl@mtnl.net.in

(संजय सावंत, भाप्रसे)
व्यवस्थापकीय संचालक